# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व. इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय,
छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता.जि. ठाणे ४०११०१

25 वर्षे विकासाची

"माझे शहर, माझा अभिमान"

जा.क्र.मनपा/सा.प्र./५७ /२०२६-२७ दिनांक :-०६/०४/२०२६

## // परिपत्रक //

**विषय :-** **मिरा भाईंदर महानगरपालिका मुख्य कार्यालय दुसरा मजला येथील स्व. लाल बहाद्दुर शास्त्री सभागृह (मा. स्थायी समिती सभागृह) वापराबाबत.**

उपरोक्त विषयान्वये, महानगरपालिकेच्या मा. स्थायी समिती व इतर विविध समितींच्या सभांचे आयोजन महानगरपालिका, मुख्य कार्यालय, दुसरा मजला, येथील स्व. लाल बहाद्दुर शास्त्री सभागृह येथे वेळोवेळी करण्यात येत असते. तसेच मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. सभापती, स्थायी समिती यांचेमार्फत विविध विषयांवर उक्त सभागृहामध्ये बैठकीचे आयोजन करण्यात येते.

मा. स्थायी समिती सभागृह हे सचिव विभागाच्या अखत्यारित येत असून, सभागृहाची देखभाल व दुरुस्ती बांधकाम विभागामार्फत करण्यात येत आहे. महानगरपालिकेचे काही विभाग प्रमूख स्व. लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहामध्ये सचिव विभागास कोणतीही पूर्वसूचना न देता बैठकीचे आयोजन करीत आहेत. त्यामुळे स्थायी समिती, इतर समित्या व पदाधिकारी यांचे बैठकींचे आयोजन करणेस अडथळा निर्माण होत असतो.

तरी यापूढे स्व. लाल बहाद्दुर शास्त्री सभागृहात बैठकीचे आयोजन करावयाचे असल्यास सचिव विभागास लेखी कळवून, महापालिका सचिवांच्या लेखी परवानगीने बैठकीचे आयोजन करण्यात यावे. जेणेकरुन मा. स्थायी समिती सभा, इतर समितींच्या सभा तसेच मा. महापौर, मा. उपमहापौर व मा. सभापती, स्थायी समिती यांच्या बैठकीस अडथळा निर्माण होणार नाही. कृपया याबाबत आवश्यक दक्षता घेण्यात यावी.

**(डॉ. सचिन बांगर)**
**उप-आयुक्त (मुख्यालय)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत कार्यवाहीस्तव :-**

१) सर्व उपायुक्त
२) सर्व विभागप्रमुख

**प्रत माहितीस्तव :-**

१) मा. आयुक्त,
२) मा. अतिरिक्त आयुक्त (१) व (२)